प्रा सं गि क

# यशोगाथा

**स्वामी ज्ञानमूर्त्यानंद,** रामकृष्ण मठ, नागपूर

*रामकृष्ण मठ, नागपूरतर्फे चालवण्यात येणाऱ्या विवेकानंद विद्यार्थी भवनातील माजी विद्यार्थी श्री. संकेत वाघे याने नुकत्याच झालेल्या केंद्रीय लोकसेवा आयोग अर्थात UPSC परीक्षेत संपूर्ण भारतामधून २६६ वा क्रमांक (रँक) मिळवून सुयश प्राप्त केले आहे. त्या निमित्ताने दि. २८ सप्टेंबर रोजी रामकृष्ण मठातील अखंडानंद सभागृह येथे त्याचा सत्कार करण्यात आला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी स्वामी ब्रह्मस्थानंद महाराज होते. नागपूर शहराचे महापौर माननीय श्री. दयाशंकरजी तिवारी यांनी प्रमुख अतिथीचे स्थान भूषवले. या कार्यक्रमास अनेक विद्यार्थी, प्राध्यापक आणि भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री. संकेत बळवंत वाघे यांच्या भाषणाचे मराठी अनुलेखन येथे वाचकांसाठी प्रस्तुत करीत आहोत.*

**नमः यतिराजाय विवेकानंदसूरये।**
**सच्चित्सुखस्वरूपाय स्वामिने तापहारिणे।।**

जगज्जननी श्रीमां सारदा, श्रीरामकृष्ण परमहंस आणि युवा आदर्श स्वामी विवेकानंद यांच्या चरणी प्रणाम अर्पण करतो. मंचावर उपस्थित रामकृष्ण मठाचे अध्यक्ष तसेच आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष पू. स्वामी ब्रह्मस्थानंदजी महाराज, नागपूर महानगरपालिकेचे महापौर श्री. दयाशंकरजी तिवारी, पू. स्वामी ज्योति:स्वरूपानंदजी महाराज, माझ्या महाविद्यालयातील प्राध्यापिका डॉ. सुजाता देवमॅडम, वरिष्ठ साधुगण, मातृवर्ग तसेच भगिनी आणि बंधूंनो –

आता माझा परिचय करून देत असताना सूत्रसंचालक निहारकडून ‘वक्ता’ आणि अशा काही मोठ्या शब्दांचा माझ्यासाठी वापर करण्यात आला. परंतु मी येथे वक्त्याच्या नाही तर ‘पुत्रा’च्या भूमिकेतून माझे वक्तव्य करीत आहे. मी प्रत्येक वेळेस म्हणतो की ‘रामकृष्ण मठ, विवेकानंद विद्यार्थी भवन हे माझे दुसरे घरच आहे.’ माझा जन्म हिंगणघाटचा, परंतु भविष्यातील दिशा कुठे मिळाली असेल? संस्कारांचा भाव कुठे प्राप्त झाला असेल तर तो मला इथेच प्राप्त झाला आणि यामुळेच या संस्थेचे माझ्या जीवनात एक अद्वितीय असे स्थान आहे. श्री. दयाशंकरजींनी आता त्यांच्या भाषणात ४४ वेळा ‘संकेत’ या शब्दाचा उल्लेख केला. या संकेत शब्दाने नुकताच माझ्या जीवनात बदल घडवून आणला. २ सप्टेंबर २०२१ रोजी दिल्ली येथे भोलपूर हाऊस, शहाजहान रोड येथे माझी मुलाखत झाली. मुलाखतीसाठी पहिल्यांदा तेथे गेलो होतो. तेथे श्रीमती स्मिता नागराज मॅडम यांचे पॅनल होते. तेथे पहिल्यांदा हिंदीमध्ये प्रश्न विचारला – ‘संकेत’, ‘तुम किस बात के संकेत हो! कोरोना के? मी स्तब्ध झालो, म्हणालो, ‘चला बॉल आला आहे, आता सिक्सरच लावून देऊ.’ मी म्हणालो, ‘होय, मी संकेत! कोरोनाचा नाही, वॅक्सीनचा!’ अशाप्रकारे मुलाखतीची चांगली सुरुवात झाली. दयाशंकरजींनी एवढ्या वेळा संकेत शब्दाचा उच्चार केल्यामुळे ही गोष्ट माझ्या मनात आली.



व्यासपीठावर उपस्थित (डावीकडून) स्वामी ज्योति:स्वरूपानंद, श्री. संकेत वाघे, स्वामी ब्रह्मस्थानंद महाराज, महापौर श्री. दयाशंकर तिवारी

श्रोतेहो, मी आज येथे घरच्या मुलाच्या भूमिकेतून बोलत आहे. आईवडिलांपासून काहीही लपवता येत नाही. येथील उपस्थितांमध्ये पन्नास-साठ चेहरे असे आहेत की ज्यांनी मला मोठे होताना पाहिले आहे. मी २०१४ पासून या मठाशी जुळलेलो आहे. निहारने सुचवले की मी मठाशी कशा प्रकारे जोडला गेलो आणि यूपीएस्सीचा प्रवास कशाप्रकारे होता, याबद्दल सांगावे. रामकृष्ण मठाशी २०१४ मध्ये संपर्कात आलो. तेव्हा येथे युवा मंच – ज्याला आपण युथ फोरम म्हणतो – चालवला जात असे. त्यावेळेस स्वामी अनंतरानंद महाराज (विवेक महाराज) आणि ब्रह्मचारी विमलचैतन्य (सौरभ महाराज) हे त्याचा कार्यभार सांभाळत असत. त्यावेळेस NEERI चे संचालक डॉ. श्री. सतीश

वटे हे कार्यक्रमास वक्ता म्हणून आले होते. ते हिंगणघाटचे आणि मी पण हिंगणघाटचा! आपल्या गावचे कोणी आले आहे यामुळे मी त्या कार्यक्रमामध्ये आलो. त्या वेळेसपासून रामकृष्ण मठाशी मी एवढा जुळला गेलो की हे माझे आता दुसरे घरच मानतो. २०१५ मध्ये माहीत झाले की येथे 'विवेकानंद विद्यार्थी भवन' नावाचे मुलांसाठीचे वसतिगृह आहे. मी विचार केला, काही संस्कार व्हावयास हवेत. त्यामुळे स्वामी ज्ञानमूर्त्यानंद महाराजांबरोबर संपर्क केला. मला आजही तो दिवस आठवतो, स्वामीजींनी सांगितले की फॉर्म भरून दे. निवडप्रक्रिया होईल. माझी निवड झाली, त्या दिवसापासून मी कृतकृत्य झालो की मला अशा आलिशान, फक्त सोयींनी नाही तर विचारांनी आणि संस्कारांनी सुद्धा आलिशान अशा वसतिगृहात प्रवेश मिळाला. अशाप्रकारे मी वसतिगृहात प्रवेश घेतला.



मित्रहो, मी बारावीची परीक्षा पास झालो तेव्हा माझ्या जीवनात काही उच्च ध्येय नव्हते. त्यावेळेस मार्गदर्शनाची पण कमतरता होती. मनाची दिशा कोणत्या ठिकाणी असते – इंजिनियरिंग करायचे की मेडिकल – अशा विविध प्रकारचे विचार माझ्या मनात येत होते. पण अशी काही परिस्थिती आली की इंजिनियरिंग आणि मेडिकलची प्रवेश परीक्षा पास करून सुद्धा मला तेथे प्रवेश घेता आला नाही. मोठ्या शहरात राहावयास मिळेल, शिष्यवृत्ती (scholarship) मिळेल, शहरात मोठ्या लोकांसोबत भेटी होतील, ओळखी वाढतील आणि काही नवीन शिकण्यास मिळेल, अशा उद्देशाने माझे नागपूरला येणे झाले आणि मी या संस्थेशी जुळला गेलो.

स्वामी विवेकानंदांचा साधारण जीवनपरिचय आपल्याला असतो. शालेय पाठ्यक्रमामध्ये काही गोष्ट शिकवल्या जातात. श्रीरामकृष्ण परमहंसांच्या बाबतीत काही मोजक्याच गोष्टी ऐकावयास मिळतात, परंतु सविस्तर नाही. येथे आल्यानंतर श्रीठाकुरांच्या विचारांना वाचल्यानंतर कशाप्रकारे 'Practical Vedanta' व्यावहारिक वेदान्त जीवनात उतरू शकतो याचा जाणीव मला येथे प्राप्त झाली.

आता दुसरी गोष्ट म्हणजे विवेकानंद विद्यार्थी भवनातील अनुभव. ते सांगण्यासाठी शब्द कमी पडतील. माझे अनुभव सांगण्यासाठी मित्र आहेत, ते माझ्याबरोबर वाढले आहेत, आम्ही सोबत राहिलो आहोत. विद्यार्थी भवनात राहत असताना येथील साधुवृंदांसोबत आध्यात्मिक चर्चा होत असत. त्यातून जीवनातील उच्च आदर्शाबद्दल माहिती झाली. जीवनात किती प्रकारची प्रलोभने आहेत, distractions आहेत, त्यांवर कशाप्रकारे जय मिळवता येईल याबद्दल माहिती झाली. येथे फक्त साधूंकडूनच अथवा विचारवंतांकडूनच नाही पण येथील प्रत्येक सामान्य व्यक्तीकडून काही ना काही शिकण्यास मिळाले. उदाहरणार्थ – विवेकानंद विद्यार्थी भवनासमोरील बागेत 'कृष्णा भैया' व त्यांच्या पत्नी काम करतात. मी रोज पाहत असे – ऊन असो वा पाऊस, त्यांचे काम कधी थांबले नाही. कर्मयोगाचा वास्तविक आदर्श कुठे पाहावयास मिळाला असेल तर मी मानतो तो 'कृष्णा भैया'तच! संतोष महाराज आणि मी आज कृष्णाभैयाच्या जवळून जात होतो. संतोष महाराजांनी सांगितले की संकेत अधिकारी – कलेक्टर झाला वगैरे वगैरे. कृष्णाभैयाने माझ्याकडे पाहून स्मितहास्य केले आणि आपला झाडू घेऊन कामाला सुरुवात केली. अशाप्रकारे कर्मयोगाचा आदर्श पाहिला.

त्याचप्रकारे optimism म्हणजे आशावाद काय असतो याचे उदाहरण सांगतो. जेव्हा मी पुण्याहून नागपूरला रामकृष्ण मठात यायचो, तेव्हा 'ह्या वेळेस परीक्षा पास होऊ की नाही' मनात विचार असायचा. मठाच्या फाटकावरच आपल्याला बंडूभाऊ (श्री. उदय आपटे) भेटतात. ती एकमेव अशी व्यक्ती आहे जी मला म्हणते, 'वाघे, तुझी गाडी येथे येणार, तुझ्या मागे दोन बॉडीगार्ड राहणार, तू कलेक्टर बनून येणार आहेस.' त्यांच्या आशावादी विचारांचा इतका भडिमार झाला होता की आज गेटमधून प्रवेश करताना वाटले की बंडूभाऊ म्हणतील, "कलेक्टर आलाय!" बंडूभाऊंचा आशावाद मला येथे शिकण्यास मिळाला.

मला आठवते आहे – मी एके दिवशी कॉलेजमधून येत होतो. तेव्हा प्रकाशन विभागाच्या गेटमधून स्कुटी बाहेर

काढत जोरात एक्सिलरेटर वाढवीत एक व्यक्ती बाहेर पडली. त्यांचे नाव प्रभूजी. ते जेव्हा स्वत:चे वय सांगतात तेव्हा म्हणतात – "I am a 82 years young man. मी ब्याऐंशी वर्षांचा युवक आहे!" असे आहेत आमचे प्रभूजी सर.

श्रीरामनामसंकीर्तनाच्या वेळी आपले इलपाची काका रामनाम गाताना दिसतात. आपण डोळे उघडून त्यांच्याकडे पाहिल्यास भक्ती काय असते, भक्तिभाव काय असतो, हृदयातील स्वर कशाप्रकारे बाहेर येतो – हे समजते. आजपण मी जेव्हा ठाकुरांना प्रणाम करतो, काही मागावे तर डोळ्यांसमोर येतात इलपाची काका! 'मला पण अशा प्रकारची भक्ती प्राप्त होवो' अशी प्रार्थना मग मी करत असतो.

अशी बरेचशी उदाहरणे मला रामकृष्ण मठाच्या प्रांगणात बघायला मिळाली. मला दैनंदिनी लिहायला आवडते. माझ्या दैनंदिनीमध्ये अशा प्रकारची उदाहरणे मी लिहिलेली आहेत. जेव्हा मला गरज असते तेव्हा मी या उदाहरणांतून स्फूर्ती घेत असतो.

स्वामी विवेकानंदांच्या विचारांनी मी कसा प्रभावित आहे ते आता सांगतो. स्वामीजींच्या मार्गदर्शनात येते – योगसमन्वय. Thinking Head, Feeling Heart and Working Hand. Thinking Head अर्थात ज्ञानयोग. विचार करावयास हवा. विवेकविचार (discrimination) करावयास हवे. श्रेय आणि प्रेय यांमध्ये विवेक करायला हवा. Feeling heart म्हणजे सर्वांसाठी सहानुभूतीचा भाव, प्रेमभाव. हा भक्तीचा सिद्धांत आहे. असा ज्ञानयोग आणि भक्तियोग जोवर कर्मयोगात रूपांतरित होऊन समाजासाठी आपले कर्तव्य करण्यास सक्षम होणार नाहीत तोवर दोन्ही योग संपूर्ण होत नाहीत. असा तिन्ही योगांचा समन्वय मला स्वामीजींच्या माध्यमातून शिकायला मिळाला.

मी विद्यार्थी भवनात राहत असताना The Universal Message of Srimat Bhagavad Gita या श्रीमत् स्वामी रंगनाथानंदजी महाराजांच्या इंग्रजी ग्रंथाचे वाचन केले. मुलाखतीनंतरची जी मन:स्थिती होती त्या दिवसांत पुढील श्लोक सतत प्रेरक ठरला –

**सुख:दु:खे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ।**
**ततो युद्धाय युजस्व नैवं पापमवाप्स्यसि।।**

अर्थात, सुख असो वा दु:ख, लाभ असो वा हानी, जय असो वा पराजय, कोणत्याही परिस्थितीत आपले कर्तव्य करण्यास तत्पर व्हावे.

मला मुलाखतीनंतर खूप लोक प्रश्न विचारायचे की, आता पुढे काय? उपस्थितांपैकी सुद्धा मला अनेक प्रश्न विचारले. मी सांगितले, 'परिणाम जो काही होवो दहा ऑक्टोबरला पुन्हा पूर्वपरीक्षा आहे, मी परिणाम काय होईल याची चिंता सोडून दिलेली आहे. मी पुढील परीक्षेची तयारी सुरू करत आहे. जो काही निकाल लागेल तो लागेल.' परीक्षेदरम्यान मला उपरोक्त श्लोकाची खूप मदत झाली. अशा प्रकारच्या विविध गोष्टी मला विवेकानंद विद्यार्थी भवनात शिकण्यास मिळाल्या. चिंतनपूर्वक समजून घेत्या आल्या.

स्वामी ज्ञानमूर्त्यानंद (संतोष महाराजजी) आमचे त्या वेळचे भवनपालक (वॉर्डन) होते. त्यांचे एक वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांचे हित ज्यात आहे अशा उपक्रमांना ते प्रोत्साहन देत असत. म्हणून संतोष महाराजांचे, संपूर्ण विवेकानंद विद्यार्थी भवनाचे योगदान मी शब्दांत वर्णन करू शकत नाही. मी सर्वांना खूप खूप धन्यवाद देतो.

आजच्या निमंत्रणपत्रिकेमध्ये Invitation for Felicitation of Shri Sanket Waghe असे छापले आहे. आपल्यासाठी ते निमंत्रण असू शकते परंतु जेव्हा कधीही रामकृष्ण मठात सेवा देण्यासाठी मला बोलावण्यात येईल तो मी स्वत:साठी आदेश समजेन आणि कोणताही विचार न करता मी सेवा देण्यास उपस्थित राहीन ही गोष्ट मी येथे नमूद करू इच्छितो.

काही युवक येथे उपस्थित आहेत. माझा यूपीएस्सीचा प्रवास कसा झाला हे ते जाणू इच्छितात. मी २०१८पासून यूपीएस्सी परीक्षेची तयारी सुरू केली. काही महत्त्वाच्या गोष्टींमध्ये योग्य मार्गदर्शन अत्यंत आवश्यक आहे. सन २०१९ मध्ये मी पहिल्यांदा पूर्वपरीक्षा पास झालो पण लेखी मुख्य परीक्षा देऊ शकलो नाही. त्या दिवसांत 'सुखदु:खे समे कृत्वा' हेच तत्त्वज्ञान कामी आले. त्याप्रमाणे पुढे जात राहिलो आणि एका वर्षानंतर चार ऑक्टोबर रोजी त्याच गतीने अभ्यास करीत दुसऱ्यांदा परीक्षा दिली. जानेवारी मध्ये मुख्य लेखी परीक्षेसाठी रायपूरला गेलो. परीक्षेच्या कालावधीत तेथील रामकृष्ण आश्रमात दहा दिवस मुक्कामी होतो. दि. २४ सप्टेंबर रोजी निकाल आला. आज संपूर्ण देशात मला २६६ क्रमांक प्राप्त करून आपल्यासमोर उभा आहे. माझ्या या प्रवासामध्ये तुम्हाला सांगावे असे मी काय शिकलो? सर्वांनी यूपीएस्सी करावे असे माझे सांगणे मुळीच नाही. मी शिकलो की आपण कोणतेही करिअर (ध्येय) निवडताना तीन गोष्टींबाबत आपण जागृत असावयास हवे –

(१) मी निवडत असलेल्या करिअर/ध्येयामध्ये माझी रुची/आवड आहे का?

(२) त्या करिअरसाठी लागणारी गुणवत्ता – Physical

fitness (शारीरिक पात्रता), Mental toughness (मानसिक कणखरपणा), Intellectual sharpness (बौद्धिक तीक्ष्णता) – माझ्यात आहे का? जीवनात पुढे प्रगती करावयाची असल्यास या Spiritual Awareness (आध्यात्मिक जाण) या चतु:सूत्रीचा अवलंब करावयास हवा.

(३) आणि तिसरे म्हणजे आपले ध्येय गाठण्यासाठी लागणारी जिद्द, कर्मठता अत्यंत आवश्यक आहे. जर या बाबी तुमच्याकडे असतील तर तुम्ही स्वत:च्या करिअर/ध्येयाचा आनंद घ्याल. मग ते करियर विज्ञान शाखेतील असो वा वाणिज्य शाखेतील असो.

मी अशा काही जणांना पाहिले आहे की ते अगदी सामान्य करिअर/नोकरी करतानासुद्धा सुखी-समाधानी आहेत आणि काही लोक असेही आहेत की खूप मोठे मोठे करिअर/कामे करून सुद्धा सुखी-समाधानी नाहीत. या गोष्टी स्वत:च्या जीवनात तपासा. जर तुम्हाला वाटत असेल तर उपरोक्त तीन सल्ल्यांच्या मापदंडात योग्य आहे काय ह्याची तपासणी करा व पुढे मार्गक्रमण करा. यूपीएस्‌सी एक चांगले करिअर आहे त्यामुळे मी ते निवडले. आपण स्वत:च निर्णय घ्यावा. मित्रहो हे झाले करिअरबद्दल.

आता जीवनध्येयाबद्दल येथे सांगू इच्छितो. मी जीवनात दोन गोष्टी पाहिल्या आहेत – एक आहे 'तणाव' – काही मिळवायचे झाले की 'तणाव'. दहावी, बारावी, पदवी, बढती इत्यादी सुरू राहणार. परंतु दुसरे म्हणजे ध्येय. मला काय बनायचे आहे, मला स्वत:ल काय प्राप्त करायचे आहे – हे नव्हे तर मला समाजासाठी काही करावयाचे आहे हे आपले ध्येय आहे. एकाने खूप सुंदर म्हटले आहे, **'रास्तों से मोहब्बत कर बैठोगे तो मंजिल बुरा मान जाएगी।'**

म्हणूनच कोणतेही ध्येय/उद्देश निवडत असताना त्यास (Life Goal) जीवनाचे ध्येय बनवा. त्याला जीवनध्येय म्हणून आपलेसे करा. अशा करिअरची आपण निवड करा, एवढेच मी आपणास मार्गदर्शन करू शकतो. बंधूभगिनींनो, मी आजही विद्यार्थी आहे आणि उद्याही विद्यार्थीच असणार आहे. केवळ एका दिवसात माझे जग बदलून गेले असे नाही. मी आजीवन विद्यार्थी अवस्थेत राहू इच्छितो. नवनवीन गोष्टी शिकण्याची इच्छा आहे. येथे मला खूप काही शिकण्यास मिळाले. पुढे पण जिथे मी जाईन तेथे शिकत राहीन.

काही दिवसांपूर्वी मी ब्रह्मस्थानंदजी महाराजांना एक ई-मेल लिहिला होता. महाराजांनी मला खूप सुंदर आशीर्वचन लिहून पाठविले. त्यामध्ये त्यांनी लिहिले – 'I bless you that you will surely pass this time, if Sri Ramakrishna Dev wishes this.' पहिल्यांदा वाचले तेव्हा खूप आनंद झाला. पण परत विचार केला की, 'Sanket, you will definitely succeed in this attempt' असेही महाराज लिहू शकले असते. असे वाटण्याची थोडी पार्श्वभूमी सांगतो – 'मुलाखतीचा निकाल येण्याअगोदर डायरी (रोजनिशी) लिहीत होतो. तेव्हा मी ठाकुरांना पत्र लिहिले. त्यामध्ये माझ्या इच्छाआकांक्षा, अस्तित्वाविषयीच्या मानवी जीवनाच्या मूलभूत समस्या (Existential Crises) इत्यादी बऱ्याच गोष्टी लिहिल्या आणि काहीही करून मला rank द्या असे लिहिले.

दुसऱ्या दिवशी मी पुन्हा डायरी लिहिली आणि महाराजजींचा ई-मेल पाहिला. मी तो ई-मेल आणि त्या डायरीचे पानही तुम्हाला दाखवू शकतो. महाराजांनी खूप मार्मिकपणे लिहिले होते. माझी विचारांची प्रगल्भता त्यातून वाढली. मग मी ज्या पानावर ठाकुरजींना पत्र लिहिले होते त्यावर काट मारली आणि पुढे लिहिले – 'मी माझे काम पूर्ण केले – हा माझा कर्मयोग.' मी ह्या पदास लायक आहे की नाही ते तपासण्याची जबाबदारी यूपीएस्‌सीची आहे. त्यांना जसा निर्णय द्यायचा असेल तसा ते देवोत परंतु पद प्राप्त करून मी समाजासाठी काही करू शकेन की नाही, काही चांगले बदल, प्रशासनात पारदर्शकता आणू शकेल की नाही – हे सर्व आपल्यापैकी कोणीच जाणत नाही. पण भगवान श्रीरामकृष्ण जाणतात. आणि म्हणून पुन्हा लिहिले, rank मिळावे ही माझी इच्छा आहे. परंतु प्रशासनासाठी जे योग्य आहे, समाजासाठी जी योग्य व्यक्ती आहे त्या व्यक्तीस rank मिळावा, ही मी ठाकुरांना प्रार्थना केली. हे मी २२ तारखेच्या रात्रीस ठाकुरांना लिहिले. मित्रहो, 'माझे' आणि 'दुसऱ्याचे' असे चिंतन करीत ठाकुरांना शेवटी जे पत्र लिहिले त्यामध्ये लिहिले – 'मला काही देऊ नका'. मला दिल्यास मी स्वीकार करेनच, परंतु 'मी साऱ्या जनतेसाठी काही करू शकेन' असे जर वाटत असेल तरच हा सन्मान मला द्या.' ठाकुरांनी हा सन्मान मला दिला आहे, असे मी समजतो. यूपीएस्‌सीने मला योग्य ठरवून माझी जबाबदारी वाढवलेली आहे.

मी श्रीठाकुरांच्या चरणी प्रार्थना करतो की त्यांच्या सर्व आदर्श, अपेक्षा मी पूर्ण करीन असे सामर्थ्य त्यांनी मला द्यावे. सर्व वरिष्ठांकडे मी आशीर्वादाची याचना करतो आणि माझ्या शब्दांना विराम देतो.

○○○